ePaper
वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज(TM)

WWW.MAHAENEWS.COM | मंगळवार, दि. 12 मे 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## बंगालमध्ये SIR चा भाजपाला फायदा झाल्याचा ममतांच्या 'तृणमूल'चा आरोप






पान 3 वरुन...


कुदळवाडीत पुन्हा बुलडोझर!

### 'डीआरडीओ'ने विकसित केली अत्याधुनिक TARA प्रणाली..!

# भारतीय हवाई दल आणखी 'शक्तिशाली'

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**संरक्षण संशोधन आणि विकास संस्था (डीआरडीओ) आणि भारतीय हवाई दल (IAF) यांनी ७ मे रोजी 'टॅक्टिकल अॅडव्हान्स्ड रेंज ऑगमेंटेशन' (TARA-तारा) या स्वदेशी प्रणालीची यशस्वी चाचणी केली. या प्रणालीच्या मदतीने विना-मार्गदर्शित (अनगाइडेड) क्षेपणास्त्र किंवा बॉम्बला अचूक लक्ष्यभेदी 'गाइडेड' शस्त्रात रूपांतरित करता येणार आहे.**




डीआरडीओने विकसित केलेली 'तारा' प्रणाली ही एक मॉड्युलर किट असून ती पारंपरिक क्षेपणास्त्रांवर सहज बसवता येते. विमानातून क्षेपणास्त्र डागल्यानंतर या किटमधील दुमडलेले पंख उघडतात आणि एरोडायनामिक नियंत्रण प्रणाली कार्यान्वित होते. यामुळे क्षेपणास्त्र हवेत तरंगत लांब अंतरापर्यंत प्रवास करत लक्ष्यावर अचूक मारा करू शकते. या प्रक्रियेत इनर्शियल नेव्हिगेशन आणि सॅटेलाईट आधारित प्रणालीचा वापर केला जातो.

या तंत्रज्ञानामुळे वैमानिकांना शत्रूच्या टप्प्यात न जाता सुरक्षित अंतरावरून हल्ला करणे शक्य होणार आहे. त्यामुळे युद्धस्थितीत लढाऊ विमानांचे नुकसान टाळण्यास मदत होईल आणि हवाई दलाची कार्यक्षमता वाढेल. तसेच, पारंपरिक 'डम्ब बॉम्ब'ना 'प्रिसिजन गाइडेड म्युनिशन्स'मध्ये रूपांतरित करण्याची क्षमता या प्रणालीत असल्यामुळे नव्याने महागडी शस्त्रे तयार करण्याची गरज कमी होईल. यामुळे संरक्षण खर्चात बचत होऊन स्वदेशी तंत्रज्ञानाला चालना मिळणार आहे. 'तारा' प्रणालीचे विविध व्हर्जन २५० ते ५०० किलो क्षमतेच्या शस्त्रांसाठी विकसित करण्यात आले आहेत.

ओडिशाच्या किनारपट्टीवर हवाई दलाच्या लढाऊ विमानातून या प्रणालीची यशस्वी चाचणी घेण्यात आली. हैदराबाद येथील रिसर्च सेंटर इमारात (RCI) आणि इतर प्रयोगशाळांच्या सहकार्याने ही प्रणाली विकसित करण्यात आली आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी या यशस्वी चाचणीबद्दल डीआरडीओ, हवाई दल आणि संबंधित उद्योगांचे अभिनंदन करत स्वदेशी संरक्षण क्षमतांच्या बळकटीसाठी हा महत्त्वाचा टप्पा असल्याचे नमूद केले. ही प्रणाली पूर्ण चाचण्या पूर्ण झाल्यानंतर लवकरच भारतीय हवाई दलाच्या ताफ्यात समाविष्ट होण्याची शक्यता आहे.




### तारा प्रणाली कशी कार्य करते?

'टॅक्टिकल अॅडव्हान्स्ड ऑगमेंटेशन' (TARA) हे मॉड्युलर अनगाइडेड क्षेपणास्त्रावर बसवल्यानंतर त्याला पंख व एरोडायनामिक नियंत्रण विमानातून डागल्यानंतर पंख आणि क्षेपणास्त्र तरंगत लांब अंतर पार इनर्शियल नेव्हिगेशन सॅटेलाईट आधारित प्रणाली मार्ग दुरुस्त करत अचूक लक्ष्यभेदन सुनिश्चित करतात.



### धोरणात्मक आणि आर्थिक महत्व

या प्रणालीमुळे वैमानिकांना शत्रूच्या टप्प्यात न जाता सुरक्षित अंतरावरून अचूक हल्ला करता येतो, त्यामुळे विमानांचे नुकसान कमी होते. तसेच पारंपरिक 'डम्ब बॉम्ब'ना 'स्मार्ट वेपन'मध्ये रूपांतरित केल्याने नवीन शस्त्रे तयार करण्याचा खर्च वाचतो आणि स्वदेशी तंत्रज्ञानाला चालना मिळते.

### भारताचे स्वदेशी हवाई संरक्षण तंत्रज्ञानात मोठे पाऊल




ओडिशा किनारपट्टीवर झालेल्या यशस्वी चाचणीमुळे भारताने स्वदेशी हवाई संरक्षण क्षमतेत महत्त्वाची झेप घेतली आहे. संरक्षण संशोधन आणि विकास संस्था आणि भारतीय हवाई दल यांच्या सहकार्याने विकसित प्रणाली भविष्यात संरक्षण दलासाठी गेमचेंजर ठरणार आहे.

### "पहिलेच ग्लाईड वेपन"

अत्याधुनिक व किफायतशीर तंत्रज्ञानावर आधारित 'तारा' भारताचे पहिले स्वदेशी वेपन मानले जात उद्योगांच्या सहभागातून विकसित झालेल्या या किटचे उत्पादन झाले असून, कमी अधिक अचूक लांब पल्ल्याचे उपलब्ध देण्याची क्षमता यात आहे.

# पुणे विद्यापीठाचा कॉलेजांना इशारा

## बीओडी पोर्टलसाठी 18 मेपर्यंत अंतिम मुदत; नियम न पाळणाऱ्या महाविद्यालयांवर कारवाईचा इशारा

**महाईन्यूज ।**
**पुणे**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या महाविद्यालयांमध्ये पन्नास टक्के शिक्षक असल्याची माहिती बीओडी पोर्टलवर अपलोड करण्यासाठी विद्यापीठ प्रशासनाने वेळोवेळी मुदत दिली होती.**



परंतु अनेक महाविद्यालयांनी संबंधित माहिती भरलेली नाही. त्यामुळे अखेर विद्यापीठाने येत्या 18 मे पर्यंत अंतिम मुदतवाढ दिली आहे. दिलेल्या मुदतीमध्ये शिक्षकांची माहिती अपलोड करून न देणाऱ्या महाविद्यालयांची 2026-27 या शैक्षणिक वर्षाचे प्रथम वर्षाचे प्रवेश थांबवले जाणार असल्याचे विद्यापीठ प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

विद्यापीठाने प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकानुसार, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, विद्यापीठ अनुदान आयोग तसेच शासनाने निर्धारित केलेल्या किमान मानांकानुसार ज्या संलग्नित महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्थामध्ये 31 मार्च 2026 पर्यंत नियमित आणि तदर्थ स्वरूपात नियुक्त झालेल्या आणि विद्यापीठाची मान्यता असलेल्या शिक्षकांची किमान संख्या एकत्रितपणे 50 टक्क्यांपेक्षा कमी असेल अशा संलग्नित महाविद्यालय, मान्यताप्राप्त परिसंस्थेतील अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाचे विद्यार्थी प्रवेश शैक्षणिक वर्ष 2026-27 मध्ये थांबविण्यात यावेत, असा निर्णय विद्यापीठाच्या विद्यापरिषदेने 24 जानेवारी 2026 घेतला आहे.

शिक्षक नियुक्तीची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी 31 मार्च 2026 पर्यंत मुदत देण्यात आली होती. त्यानंतर प्रक्रिया पूर्ण करण्याकरीता दिनांक 15 एप्रिल 2026 पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानंतरही 9 मे 2026 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. परंतु, असे निदर्शनास आले आहे की अद्याप बऱ्याच महाविद्यालयांची, मान्यताप्राप्त परिसंस्थांची माहिती बीओडी पोर्टलवर ऑनलाईन स्वरूपात अपलोड करणे बाकी आहे. मुदतवाढीनंतरही माहिती न भरल्यास संबंधित महाविद्यालयांवर कठोर प्रशासकीय कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही विद्यापीठ प्रशासनाने दिला आहे.

### नुकसान टाळण्यासाठी 18 मेपर्यंत मुदतवाढ

त्यामुळे संबंधित महाविद्यालयांचे नुकसान टाळण्यासाठी त्यांना 18 मेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. ही अंतिम मुदतवाढ असून, त्यानंतर कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ देण्यात येणार नाही. याची सर्व संबंधितांनी गांभीर्याने नोंद घेऊन आवश्यक ती कार्यवाही त्वरित पूर्ण करावी. माहिती अपलोड करण्याची प्रक्रिया पूर्ण न केल्यास महाविद्यालयांना काहीही म्हणायचे नाही, असे समजून महाविद्यालयातील, परिसंस्थेमधील प्रथम वर्षाचे प्रवेश थांबविण्याचा निर्णय घेण्यात येईल, असेदेखील विद्यापीठ प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

---

## शंभरावे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पुण्यात; स्थळाची घोषणा 14 जूनला

**महाईन्यूज ।**
**पुणे**

**महाराष्ट्र साहित्य परिषदच आगामी शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करणार असल्याचे रविवारी झालेल्या साहित्य महामंडळाच्या बैठकीत शिक्कामोर्तब झाले आहे. पुढील बैठक येत्या 14 जून रोजी पुण्यात होणार असून, या बैठकीत साहित्य संमेलनाचे स्थळ ठरणार आहे.**




या संमेलनासाठी सहसंयोजक म्हणून पुणे पुस्तक महोत्सव आणि पुणे नगर वाचन मंदिर यांच्याकडून सहआयोजकाचा प्रस्ताव देण्यात आला आहे. साहित्य महामंडळाच्या रविवारी झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयांची माहिती महामंडळाचे अध्यक्ष योगेश सोमण यांनी पत्रकार परिषदेत दिली. साहित्य महामंडळाच्या प्रमुख कार्यवाह स्वाती महाळंक आणि कोषाध्यक्ष प्रदीप निफाडकर या वेळी उपस्थित होते.

साहित्य महामंडळाचे प्रभारी अध्यक्ष गुरय्या रे. स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सोमण, महाळंक आणि निफाडकर यांनी साहित्य महामंडळाचे पदाधिकारी म्हणून सूत्रे स्वीकारली. स्वामी यांचा कार्यकाळ संपुष्टात आल्याने त्यांच्या जागी पुरुषोत्तम सप्रे (भोपाळ) यांची महामंडळाच्या उपाध्यक्षपदी निवड केली आहे. तसेच, या वेळी साहित्य संमेलन स्थळ निवड समितीची स्थापना करण्यात आली. त्यामध्ये साहित्य महामंडळाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, प्रमुख कार्यवाह, कोषाध्यक्ष यांच्यासह प्रतिभा सराफ (मुंबई मराठी साहित्य संघ), रामचंद्र काळुंखे (मराठवाडा साहित्य परिषद) आणि लखनसिंह कटरे (विदर्भ साहित्य संघ) यांचा समावेश आहे. पत्रकार परिषदेला मसापचे कार्यवाह सुनील महाजन आणि प्रसाद मिरासदार उपस्थित होते. सोमण म्हणाले, की पुण्यात होणाऱ्या शंभराव्या साहित्य संमेलनाच्या स्थळाची 14 जून रोजी घोषणा करण्यात येणार आहे. त्यासाठी स्थळ निवड समितीची स्थापना रविवारच्या बैठकीत करण्यात आली. सर परशुरामभाऊ महाविद्यालय, पोलिस मैदान (शिवाजी नगर), फर्ग्युसन महाविद्यालय आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अशा विविध ठिकाणांची पाहणी या समितीकडून 12 आणि 13 जून रोजी केली जाणार आहे. त्यानंतर 14 जून रोजी स्थळनिश्चिती होईल. या संमेलनासाठी सहसंयोजक म्हणून इच्छुक असलेल्या दोन संस्थांपैकी एका संस्थेची निवडही 14 जून रोजी निश्चित केली जाणार आहे.

### शंभराव्या साहित्य संमेलनानंतर विश्व साहित्य संमेलन

संवाद पुणेचे अध्यक्ष सुनील महाजन आणि महाराष्ट्र साहित्य कला प्रसारिणी सभेचे सचिन इटकर यांच्या माध्यमातून दुबईतील महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष अजय भांगे यांनी साहित्य महामंडळाला विश्व साहित्य संमेलनाचे निमंत्रण दिले आहे. मात्र, शंभरावे संमेलन पार पडल्यानंतर या प्रस्तावावर निर्णय घेण्यात येणार आहे. या प्रस्तावावर निर्णय घेताना तेथील युद्धजन्य परिस्थिती आणि इतर माहितीचा आढाव घेतला जाणार आहे, असे साहित्य महामंडळाचे अध्यक्ष योगेश सोमण यांनी सांगितले.

# कुदळवाडीत पुन्हा बुलडोझर!




## अनधिकृत धार्मिक स्थळांवर महापालिकेचा 'सर्जिकल स्ट्राईक'

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिका आणि पिंपरी-चिंचवड पोलिसांनी रविवारी मध्यरात्री चिखली-कुदळवाडी परिसरात मोठी संयुक्त अतिक्रमण कारवाई राबवत अनधिकृत धार्मिक प्रार्थनास्थळांवर बुलडोझर चालवला. कडेकोट पोलीस बंदोबस्तात पार पडलेल्या या कारवाईमुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. प्रशासनाने प्रतिबंधात्मक उपाययोजना करत अनेक ठिकाणी नाकाबंदी केली होती.**

स्थानिक पातळीवर मिळालेल्या माहितीनुसार, चिखली-कुदळवाडी परिसरात २१ हून अधिक अनधिकृत धार्मिक प्रार्थनास्थळे होती. त्यापैकी किती स्थळांवर कारवाई झाली? याचा अधिकृत आकडा मिळालेला नाही. मात्र, राज्यातील अनधिकृत धार्मिक स्थळांवर एकाच रात्रीत केलेली ही सर्वात मोठी कारवाई आहे.

फेब्रुवारी २०२५ मध्ये कुदळवाडी परिसरातील अनधिकृत भंगार दुकाने आणि अतिक्रमण हटविण्यासाठी मोठी मोहीम राबविण्यात आली होती. त्यामध्ये सुमारे १ हजार एकर क्षेत्र अतिक्रमण मुक्त केले होते. त्यानंतर पुन्हा एकदा प्रशासनाने कारवाईचा हातोडा उगारत धार्मिक स्थळांवरील अतिक्रमण हटविण्याची मोहीम सुरू केली आहे.

या कारवाईदरम्यान मोठा पोलीस फौजफाटा तैनात करण्यात आला होता. संवेदनशील परिस्थिती लक्षात घेता हिंदुत्ववादी आमदार महेश लांडगे यांच्या निवासस्थानाबाहेरही विशेष पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिसांकडून सतत गस्त आणि नाकाबंदी करण्यात आली.

> “ पिंपरी चिंचवड शहरामध्ये नागरिकांनी कोणत्याही प्रकारची अनधिकृत बांधकामे उभारू नयेत. नियमबाह्य बांधकामांविरोधात महानगरपालिका प्रशासनाची कारवाई यापुढेही सातत्याने सुरू राहणार आहे. नागरिकांनी कायद्याचे पालन करून शहराच्या नियोजनबद्ध विकासाला सहकार्य करावे.
>
> - डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

### संयुक्त कारवाईचा धडाका...

पिंपरी-चिंचवड महापालिका आणि पोलिसांनी चिखली-कुदळवाडी परिसरात मध्यरात्री मोठी संयुक्त अतिक्रमण कारवाई राबवत अनधिकृत धार्मिक प्रार्थनास्थळांवर बुलडोझर चालवला. कडेकोट पोलीस बंदोबस्त, ठिकठिकाणी नाकाबंदी आणि सतत गस्त ठेवत ही कारवाई पार पडली. परिसरातील २१ हून अधिक अनधिकृत स्थळांवर कारवाई झाल्याची माहिती असून, या धडक मोहिमेमुळे तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. संवेदनशीलता लक्षात घेता प्रशासनाने विशेष खबरदारी घेत कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी व्यापक उपाययोजना केल्या.





> “ पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने कुदळवाडी आणि परिसरातील अनधिकृत धार्मिक स्थळांवर सोमवारी पहाटे बुलडोझर चालवला. वास्तविक, “देशविघातक प्रवृत्तींना आश्रय देणाऱ्या बेकायदेशीर प्रार्थनास्थळांवर कारवाई होणे आवश्यक होते. राष्ट्र सुरक्षेच्या दृष्टीने कोणतीही तडजोड केली जाणार नाही. या कारवाईत काही हिंदू धार्मिक स्थळांचेही नुकसान झाले आहे, याची खंत आहे. मात्र, ती अधिकृत जागी नियमांनुसार पुनर्स्थापित करण्यासाठी पुढाकार घेणार आहोत.
>
> - महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

---

## देहूगावातील इंद्रायणी नदी प्रदूषणाच्या विळख्यात

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**तीर्थक्षेत्र देहूगावातील पवित्र इंद्रायणी नदी सध्या प्रदूषणाच्या विळख्यात सापडली असून, शहरातील सोसायट्या व परिसरातील गटारांचे मैला मिश्रित सांडपाणी थेट नदीपात्रात सोडले जात असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या दूषित पाण्यामुळे वारकरी भाविकांच्या आरोग्यावर मोठा धोका निर्माण झाला आहे.**



त्यामुळे शासन वारकऱ्यांच्या आरोग्याशी खेळत आहे का?, असा संतप्त सवाल भाविक आणि स्थानिक नागरिक उपस्थित करत आहेत. इंद्रायणी नदीत सांडपाणी मिसळणे तातडीने थांबवून कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात; अन्यथा इंद्रायणीची स्थितीही पवना नदीप्रमाणे होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

### तात्पुरते उपाय; कायमस्वरूपी तोडगा नाही

प्रत्येक मोठ्या धार्मिक सोहळ्यापूर्वी प्रशासनाकडून तात्पुरते उपाय केले जातात. आढावा बैठका, सूचना आणि तात्पुरते बांध घालून परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न होतो. मात्र, सोहळा संपताच पुन्हा परिस्थिती ‘जैसे थे’ होत असल्याचे वास्तव आहे. शासनाच्या श्रीक्षेत्र विकास आराखड्यांतर्गत राबविण्यात आलेली भुयारी गटार योजना निष्फळ ठरत असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.



## भूमिका

**पश्चिम बंगालच्या राजकारणात झालेल्या मोठ्या उलथापालथीनंतर पुन्हा एकदा नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांच्या राजकीय रणनीतीची चर्चा देशभर रंगू लागली आहे. अनेक वर्षे बंगालमध्ये अभेद्य मानल्या गेलेल्या ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसला यावेळी मोठा धक्का बसला.**

# अमित शाह यांच्या रणनीतीने ममता बॅनर्जी अडचणीत



भाजपने बंगालमध्ये केलेली झपाट्याने वाढ ही केवळ निवडणूक यशाची कथा नाही, तर संघटनशक्ती, नियोजन आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांचे उदाहरण ठरली आहे. गेल्या काही वर्षांत भाजपने पश्चिम बंगालमध्ये आपली मुळे घट्ट करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. २०१६ मध्ये केवळ तीन जागांवर समाधान मानावे लागलेल्या भाजपने २०२१ मध्ये ७७ जागांपर्यंत मजल मारली आणि आता २०२६ मध्ये २०७ जागांपर्यंत पोहोचत सत्ता स्थापनेचा मार्ग मोकळा केला. हा प्रवास अचानक घडलेला नाही. अमित शाह यांनी बंगालमध्ये कार्यकर्त्यांचे जाळे उभे केले, बूथ पातळीवर संघटन मजबूत केले आणि निवडणूक व्यवस्थापनात काटेकोर नियोजन राबवले.

निवडणुकीदरम्यान केंद्रीय सुरक्षा दलांची मोठ्या प्रमाणावर तैनाती करण्यात आली. त्यामुळे मतदान भयमुक्त वातावरणात पार पडल्याचा दावा भाजपकडून करण्यात आला. तृणमूल काँग्रेसच्या कार्यकर्त्यांकडून मतदारांवर दबाव टाकला जात असल्याच्या आरोपांवर भाजपने जोरदार प्रचार केला. याचबरोबर घुसखोरीचा मुद्दाही भाजपने प्रभावीपणे जनतेसमोर मांडला. भारत-बांगलादेश सीमेवरील सुरक्षेचा प्रश्न आणि अवैध घुसखोरांना राजकीय संरक्षण दिले जात असल्याचा आरोप हा भाजपच्या प्रचाराचा केंद्रबिंदू ठरला. अमित शाह यांनी स्वतः बंगालमध्ये तळ ठोकून प्रचार मोहीम राबवली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभा, रोड शो आणि थेट जनसंपर्कामुळे भाजपच्या प्रचाराला वेग आला. भाजपने निवडणुकीला केवळ राजकीय लढाई न मानता संघटनात्मक युद्ध म्हणून लढवले. त्याचा परिणाम मतदानाच्या आकडेवारीत आणि अंतिम निकालात स्पष्ट दिसून आला. दुसरीकडे, पराभवानंतर तृणमूल काँग्रेस आणि विरोधी पक्षांकडून मतचोरीचे आरोप करण्यात आले. मात्र भारतीय राजकारणात पराभवानंतर आरोप-प्रत्यारोप होणे नवे नाही. खरा प्रश्न असा आहे की, विरोधी पक्षांनी जनतेशी असलेला संवाद आणि संघटनात्मक ताकद वाढवण्यावर कितपत भर दिला? केवळ टीका आणि आरोप करून निवडणुका जिंकता येत नाहीत, हे बंगालच्या निकालाने पुन्हा अधोरेखित केले.

मोदी-शाह जोडीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे सातत्य. विजय मिळाला तरी पुढच्या लक्ष्याची तयारी आणि पराभव झाला तरी नव्या रणनीतीची आखणी हे त्यांचे राजकारण आहे. बंगालमधील विजयाने भाजपचा आत्मविश्वास आणखी वाढवला आहे. आता विरोधी पक्षांसमोर केवळ टीका करण्याऐवजी जनतेच्या अपेक्षा समजून घेऊन नव्या नेतृत्वाची आणि प्रभावी संघटनशक्तीची उभारणी करण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे.

## प्रासंगिक »

### रोगापेक्षा इलाज भयंकर

**कधी-कधी एखाद्या संकटातून बाहेर पडण्यासाठी आपण असे उपाय योजतो की, 'आगीतून बाहेर पडून फुफाट्यात' अशी आपली अवस्था होते. तरीही पुढच्या वेळी आपण शहाणे होत नाही.**

हाच प्रकार आपल्या आयुष्यात वारंवार घडतो, मग प्राण्यांच्या दुनियेत न घडला तरच नवल! घार आणि गिधाडे यांची भीती वाटते म्हणून काही बुलबुलांनी आपल्या संरक्षणासाठी ससाण्याला विनंती केली.

ससण्याला आयतीच शिकार सापडली. त्याने ही विनंती तात्काळ मान्य केली आणि त्या सर्व बुलबुलांना तात्काळ संरक्षण दिले. आता घारी-गिधाडे यांचा त्रास वाचला. बुलबुले सुखी झाली. पण, काही काळानंतर त्यांच्या लक्षात आले की, आपली संख्या एकएकने कमी होते आहे. ससाण्याने जितका काळ संरक्षण केले, तेवढ्या काळात घारी-गिधाडांनी खाऊनही एवढी संख्या कमी झाली नसती, हे त्यांना कळून चुकले. आपल्या संरक्षणाच्या बदल्यात ससाण्याने वसूल केलेली किंमत जबर आहे, हे त्यांना पटले.

- तात्पर्य : रोगापेक्षा इलाज भयंकर! आपल्या जीवनात अशी वेळ येऊ नये म्हणून वेळीच दक्षता घ्यायला हवी.

पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणुकीनंतर पुन्हा एकदा हिंसाचाराने डोके वर काढले आहे. विजय आणि पराभवाच्या राजकारणात सामान्य नागरिकांचे जीवन मात्र भीतीच्या छायेत गेले आहे.

# मराठीचा अभिमान की केवळ आभास?




मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यानंतर राज्यभर अभिमानाची भावना व्यक्त झाली. विविध कार्यक्रम, उपक्रम आणि घोषणांमधून मराठीचा गौरव करण्यात आला. मात्र याच काळात दहावीच्या परीक्षेत तब्बल ९४ हजार विद्यार्थी मराठी विषयात अनुत्तीर्ण झाल्याची बाब समोर आली आणि वास्तवाचे कठोर चित्र स्पष्ट झाले.

हा केवळ निकाल नसून मराठी भाषेच्या भवितव्याबाबतचा गंभीर इशारा आहे.आज अनेक घरांमध्ये मुलांशी इंग्रजीत संवाद साधणे प्रतिष्ठेचे मानले जाते. मराठी बोलणे म्हणजे मागासलेपण, तर इंग्रजी म्हणजे आधुनिकता अशी चुकीची मानसिकता वाढताना दिसते. परिणामी इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडे पालकांचा ओढा वाढला असून मराठी शाळा टिकून राहण्यासाठी संघर्ष करत आहेत. अनेक विद्यार्थ्यांना शुद्ध मराठीत लिहिणे, वाचन समजून घेणे किंवा विचार मांडणे कठीण जात आहे.

सोशल मीडिया, मोबाईल आणि इंग्रजी डिजिटल माध्यमांचा वाढता प्रभाव यामुळे दैनंदिन व्यवहारातून मराठीचा वापर कमी होत चालला आहे. त्यातच मराठी शिकवण्याच्या जुनाट आणि कंटाळवाण्या पद्धतींमुळे विद्यार्थ्यांचा भाषेशी भावनिक संबंध निर्माण होत नाही. भाषा ही ‘जगण्याची गोष्ट’ न राहता फक्त ‘परीक्षेचा विषय’ बनते आणि तिथेच खरी समस्या सुरू होते.

मराठी टिकवण्यासाठी केवळ आंदोलन, घोषणा किंवा राजकारण पुरेसे नाही. मराठी शिक्षणाचा दर्जा उंचावणे, आधुनिक अध्यापन पद्धती विकसित करणे, दर्जेदार बालसाहित्य उपलब्ध करणे आणि डिजिटल माध्यमात सकस मराठी सामग्री निर्माण करणे आवश्यक आहे. इंग्रजी शिकणे गरजेचेच आहे; परंतु त्यासाठी मातृभाषेपासून दूर जाण्याची आवश्यकता नाही. उलट मजबूत मातृभाषाच विचारशक्ती अधिक सक्षम बनवते.

भाषेचे संवर्धन फलकांवर किंवा भाषणांत होत नाही, तर घरात, शाळेत आणि दैनंदिन व्यवहारात होते. प्रत्येकाने आपल्या व्यवहारात मराठीला स्थान दिले, तरच मातृभाषेवरील हे सावट दूर होईल. अन्यथा अभिमानाच्या घोषणा राहतील; पण मराठी नव्या पिढीपासून दूर जात राहील.

## ।। अभंगवाणी ।।



गरुडाचें वारिकें कासे पीतांबर ।
सांवळें मनोहर कैं देखेन ॥१॥

बरवया बरवंटा घनमेघ सांवळा ।
वैजयंतीमाळा गळां शोभे ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे.
एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# राहुल गांधी म्हणजे रिजेक्टेड माल!

## संपूर्ण देशाने राहुल गांधींना नाकारले आहे; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा पलटवार

**महाईन्यूज । मुंबई**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जे सांगितले, त्याचा अर्थच राहुल गांधी यांना समजला नाही. राहुल गांधी हे रिजेक्टेड माल आहेत. संपूर्ण देशाने राहुल गांधींना नाकारले आहे, असे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काँग्रेस खासदार आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर पलटवार केला. पंतप्रधान मोदी यांनी पेट्रोल-डिझेलचा वापर, सोने खरेदी याबाबत केलेल्या आवाहनावर राहुल गांधी यांनी टीका केली होती. या टीकेचा खरपूस समाचार मुख्यमंत्री फडणवीस यांनी घेतला.**



### संपूर्ण देशाने राहुल गांधींना नाकारले

राहुल गांधी यांनी केलेल्या टीकेवर प्रत्युत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पंतप्रधान मोदी यांनी जे सांगितले त्याचा जर अर्थ राहुल गांधी यांना कळला नाही, तर याचा दोष त्यांना देता येत नाही. कुठेतरी त्यांची समजच कमी आहे, पण तो अर्थ जनतेला कळला, जनता प्रतिसाद देईल. देशामध्ये सर्वांत रिजेक्टेड नेता, रिजेक्टेड माल म्हणून अख्ख्या देशाने त्यांना नाकारले आहे. त्यांना तुम्ही महत्व देता, आम्ही देत नाही, या शब्दांत देवेंद्र फडणवीस यांनी हल्लाबोल केला. तसेच काँग्रेसची अवस्था अशी आहे की, केंद्रीय नेतृत्वाला कोणी मानत नाही. केंद्रीय नेतृत्व निर्णय घेऊ शकत नाही. केंद्रीय नेतृत्व राज्याला सोबत घेऊन जाऊ शकत नाही. कर्नाटकात आपण पाहिले, तेच आता केरळमध्ये होणार आहे, अशी टीका फडणवीस यांनी केली.

पत्रकारांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, आताच्या घडीला ज्या प्रकारची जागतिक पातळीवर परिस्थिती तयार झाली आहे, त्याचा सर्वच देशांच्या अर्थव्यवस्थेवर ताण पडत आहे. आपल्या बाजूला असलेल्या पाकिस्तानात तर पेट्रोलचे भाव साडेचारशे रुपये इतके वर गेले आहेत. पेट्रोल डिझेल याची अनेक देशात कमतरता आहे. आपल्या भारतामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळे पेट्रोल-डिझेल आणि गॅस या गोष्टी आपल्याला मिळत आहेत. पंतप्रधान मोदी यांनी म्हटले आहे की, या गोष्टींचा अमर्याद वापर आपल्याला करता येणार नाही. पुरवठा साखळीची परिस्थिती पाहता आणि परकीय चलन आपल्याला कसे वाचवता येईल, याकरिता पंतप्रधान मोदी यांनी केलेले आवाहन योग्य आहे. त्याला सर्वांनी प्रतिसाद द्यावा, अशी विनंती आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

मोदींनी जनतेकडून त्यागाची मागणी केली. सोनं खरेदी करू नका, परदेश प्रवास करू नका, पेट्रोलचा वापर कमी करा, खते आणि खाद्यतेलाचा वापर कमी करा, मेट्रोने प्रवास करा आणि घरून काम करा. हे उपदेश नाहीत, हे अपयशाचे पुरावे आहेत. १२ वर्षांत त्यांनी देशाला अशा टप्प्यावर आणले आहे की, जनतेला काय खरेदी करावे, काय खरेदी करू नये, कुठे जावे आणि कुठे जाऊ नये, हे त्यांनाच सांगावे लागत आहे. प्रत्येक वेळी, जबाबदारीतून सुटका करून घेण्यासाठी ते जबाबदारी जनतेवर ढकलतात. एका Compromised PM च्या हातात आता देश चालवण्याची सूत्रे राहिलेली नाहीत, अशी टीका राहुल गांधी यांनी एक्सवर पोस्ट करत केली होती.

दरम्यान, पश्चिम आशियातील युद्धामुळे जगभरात कच्च्या तेलाच्या किमती भडकल्या असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना पेट्रोल, डिझेलसह इंधनबचतीचे आवाहन केले. 'वर्क फ्रॉम होम', ऑनलाइन बैठका, व्हिडीओ कॉन्फरन्सिंग या पद्धती पुन्हा सुरू करा. पेट्रोल-डिझेलची बचत करणे ही राष्ट्रीय गरज आहे, असे सांगताना त्यांनी लग्नासाठी वर्षभर सोने खरेदी टाळण्याचाही सल्ला दिला आहे. जगातील पुरवठा साखळी विस्कळीत झाली असून कच्च्या तेलाचे दर गगनाला भिडले आहेत. कोरोना काळात आपण ऑनलाइन बैठका आणि 'वर्क फ्रॉम होम'ची सवय लावून घेतली होती. आता देशहितासाठी ती पद्धत पुन्हा अमलात आणण्याची वेळ आली आहे. यामुळे इंधनाचीच बचत होणार नाही, तर देशाचे कोट्यवधींचे परकीय चलनही वाचेल, असे पंतप्रधान मोदी यांनी म्हटले होते.

## कोकण ही साक्षात देवभूमी, महाराष्ट्राच्या विकासाचा कणा; सुनेत्रा पवार

**महाईन्यूज । रायगड**

**कोकण म्हणजे साक्षात देवभूमी असून इथल्या लोकांनी ती कष्टाने तयार केली आहे. कोकण हा महाराष्ट्राच्या विकासाचा कणा आहे अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी कोकणाविषयी कौतुकास्पद उद्गार काढले.**



### विकास म्हणजे निव्वळ सिमेंटचे रस्ते नाही

विकास म्हणजे निव्वळ सिमेंटचे रस्ते नाही तर लोकांच्या जीवनात आर्थिक सुबत्ता आणि त्यातून त्यांना सुख कसे मिळेल हा खरा प्रयत्न आमचा असणार आहे. अदिती ही माझी मुलगी म्हणून तिच्या मतदारसंघाकडे लक्ष देणार आहे, असे सांगतानाच दादांचे प्रेम कोकणावर होते, तसेच माझेही कोकणावर प्रेम राहील, असा शब्द सुनेत्रा अजित पवार यांनी यावेळी दिला. आजपर्यंत आम्ही दादांशिवाय कधी कार्यक्रम केला नाही, असे सुनील तटकरे यांनी सांगितले होते. दादांनी जी सुरू केलेली परंपरा आहे, ती कायम सुरू ठेवेन, असा शब्द दिला आणि या कार्यक्रमाला आले, असे सुनेत्रा पवार यांनी सांगितले.

रोहा-अष्टमी नगर परिषदेच्या हद्दीत उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते विविध विकासकामांचे भूमिपूजन झाली. त्यानंतर झालेल्या जाहीर सभेत सुनेत्रा अजित पवार बोलत होत्या.

अजित दादा नेहमी कोकणाची बाजू घेत असत. दादांना इथल्या लोकांविषयी अपार जिव्हाळा होता. मी हे का सांगतेय, कारण मी त्यांची सहचारिणी असल्याने त्याबाबत माहिती आहे. दादांना इथली लोक खूप आवडायची, अशी आठवणही सुनेत्रा अजित पवार यांनी सांगितली.

दरम्यान, रोहा शहराच्या भविष्याला सुरुवात करणारा असा क्षण असल्याचे सांगतानाच सर्व कामांचे भूमिपूजन झाल्याचे सुनेत्रा अजित पवार यांनी जाहीर केले.

रोहा-अष्टमी नगर परिषदेच्या हद्दीत सुरू होणारी ही विकासकामे शहराच्या पायाभूत सुविधांना नवी दिशा देणारी ठरणार आहेत, असेही सुनेत्रा अजित पवार यांनी नमूद केले. कोकणातील नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध असून विकासाचा वेग आणखी वाढवला जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# होर्मुझ सामुद्रधुनीत इराणचा टोल नाका!

## नियमावली जारी; ४० प्रश्नांच्या अर्जात द्यावी लागणार खरी उत्तरं अन्यथा कारवाई

**महाईन्यूज ।** इराण

**इराणने नव्याने सादर केलेला शांतता प्रस्ताव डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा एकदा फेटाळून लावला आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीवरील नाकेबंदीमुळे आर्थिक कोंडीत सापडलेला इराण या संकटातून मार्ग काढण्यासाठी धडपड करत आहे. होर्मुझ सामुद्रधुनीतून ये-जा करणाऱ्या जहाजांवर टोल आकारण्याचा विचार इराण करत असल्याची माहिती काही दिवसांपूर्वी समोर आली होती.**



दरम्यान, याबाबत आता इराणने हालचाली सुरु केल्या असून, सध्या टोल आकारण्यास सुरुवात केल्याचे एका जहाज वाहतूक नियतकालिकाने म्हटले आहे. होर्मुझवर पूर्ण नियंत्रण मिळविण्याच्या प्रयत्नाचा हा एक भाग असल्याचे सांगितले जात आहे.

पर्शियन गल्फ सामुद्रधुनी प्राधिकरणाने याबाबत एक नियमावली जाहीर केली आहे. "याद्वारे होर्मुझ सामुद्रधुनीतून प्रवास करण्यासाठी परवाना घ्यावा लागणार आहे, शिवाय यासाठी आवश्यक शुल्क देखील भरावे लागेल", असे स्पष्ट करण्यात आले आहे. नियतकालिकात प्रसिद्ध करण्यात आलेल्या माहितीनुसार, होर्मुझमधून प्रवास करणाऱ्या जहाजांना सर्व माहिती देणं बंधनकारक करण्यात आले आहे. जहाज मालकाचे नाव, विमा कंपनी, जहाजावरील सदस्यांची माहिती आणि प्रवासासाठी निश्चित मार्ग याची माहिती प्राधिकरणाला द्यावी लागणार आहे.

टोलमधून कोणाला मुभा द्यायची का? याबाबत इराण सरकारने निर्णय घेतला नसल्याचे समोर आले आहे. पण, इराणवर अमेरिकी निर्बंधांचे समर्थन करणाऱ्या देशांच्या जहाजांना होर्मुझमधून प्रवास करण्यास अडचण होऊ शकते. होर्मुझ सामुद्रधुनीत नव्याने कायदेशीर आणि सुरक्षेच्या दृष्टीने एक व्यवस्था कार्यान्वित करण्यात आली आहे, सर्वांना यासाठी सहकार्य करावे, असे इराणी लष्करी अधिकारी मोहम्मद अक्रामिनिया यांनी इराणी वृत्तसंस्थेला माहिती देताना स्पष्ट केले. २८ फेब्रुवारीला संघर्ष सुरु झाल्यापासून इराणने होर्मुझ सामुद्रधुनी बंद केली आहे. इराणवर आर्थिक बंधन लादण्यासाठी आणि करार मान्य करण्यासाठी दबावतंत्राचा भाग म्हणून अमेरिकेने देखील होर्मुझच्या सामुद्रधुनीत नाकेबंदी लागू केली आहे. करार मान्य केल्यास नाकेबंदी हटविण्यास तयार असल्याचे ट्रम्प यांनी स्पष्ट केले आहे. दरम्यान, इराणकडून आकारण्यात येणाऱ्या शुल्काला अमेरिकेने विरोध केला आहे. संयुक्त राष्ट्रात देखील ट्रम्प यांनी यासाठी आवाज उठवला आहे, असे वृत्त एएफपी वृत्तसंस्थेकडून देण्यात आले आहे. दरम्यान, रशियाने अमेरिकेच्या संयुक्त राष्ट्रातील प्रस्तावाला विरोध करणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

### ४० प्रश्नांचा अर्ज

यासाठी ४० प्रश्नांचा समावेश असलेला अर्ज तयार करण्यात आला आहे. यात विविध प्रश्नांचा समावेश करण्यात आला आहे. जहाजाचे नाव, सदस्यांची नावं, ओळख, पूर्वीची ओळख, देश, निश्चित स्थान, राष्ट्रीयत्व इ. बाबींचा समावेश करण्यात आला आहे. या अर्जात देण्यात येणारी माहिती सत्य आणि संपूर्ण स्वरुपात देण्यात यावी असेही प्राधिकरणाने स्पष्ट केले आहे. अर्जात भरण्यात आलेल्या माहितीचा ई-मेल प्रवास सुरु करण्यापूर्वी प्राधिकरणाला पाठविण्यात यावा, यानंतर प्राधिकरणाकडून ई-मेलद्वारेच पुढील सूचना दिली जाईल, असे अहवालात म्हटले आहे. अर्जातील माहिती चुकीची असल्याचे आढळून आल्यास अडथळे येऊ शकतात असाही इशारा देण्यात आला आहे.

---

# 'दुसऱ्यांवर अवलंबून राहणारा देश कधीही आत्मनिर्भर होऊ शकत नाही'

**महाईन्यूज ।** नवी दिल्ली

**अमेरिका आणि इराण यांच्यातील तणावामुळे जागतिक तेल वाहतूक विस्कळीत झाली आहे. यामुळे कच्च्या तेलाच्या दरांमध्ये सतत आणि तीव्र चढ-उतार होत आहेत. या पार्श्वभूमीवर, अदाणी समूहाचे अध्यक्ष गौतम अदाणी यांनी सोमवारी 'CII शिखर परिषदे'त ऊर्जा स्वातंत्र्याच्या विषयावर सविस्तर भाष्य केले.**



"जर एखादे राष्ट्र आपल्या अर्थव्यवस्थेला चालना देणाऱ्या ऊर्जेसाठी किंवा आपले भवितव्य घडवणाऱ्या बुद्धिमत्तेसाठी इतरांवर अवलंबून असेल, तर ते स्वतःला खऱ्या अर्थाने आत्मनिर्भर म्हणवू शकत नाही", असे गौतम अदाणी यांनी या परिषदेत म्हटले.

अमेरिका आणि इराण यांच्यातील तणावामुळे पश्चिम आशियामध्ये अशांतता निर्माण झाली असून, यामुळे कच्च्या तेलाच्या दरांमधील अस्थिरता वाढली आहे. या संदर्भात बोलताना, ऊर्जा आणि डिजिटल क्षमता या देशाच्या सामर्थ्याचा केंद्रबिंदू कशा बनत आहेत, यावर गौतम अदाणी यांनी प्रकाश टाकला.


शांतता प्रस्तावावर अमेरिका आणि इराण यांच्यात एकमत होऊ न शकल्यामुळे, कच्च्या तेलाचे दर प्रति बॅरल १०४-१०५ डॉलरच्या वर गेले आहेत. या पार्श्वभूमीवर अदाणी यांचे विधाने आले आहे. या दरवाढीमुळे 'स्ट्रेट ऑफ होर्मुझ'सह (Strait of Hormuz) जागतिक पुरवठा मार्गांमध्ये व्यत्यय येण्याची शक्यता निर्माण झाली असून, त्याबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. दरांमधील या अचानक वाढीमुळे, भारतासारख्या तेल आयातीवर अवलंबून असलेल्या अर्थव्यवस्थांच्या 'ऊर्जा-स्वावलंबना'बाबतची चर्चा पुन्हा एकदा जोर धरू लागली आहे.

तत्पूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल (रविवारी) इराण-अमेरिका तणावाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना इंधनाचा वापर कमी करण्याचे, आयातीवरील अवलंबित्व कमी करण्याचे आणि परकीय चलन वाचवण्याचे आवाहन केले होते.

### ऊर्जा आणि डिजिटल सुरक्षा देशाच्या ताकदीचे आधारस्तंभ

या पार्श्वभूमीवर, अदाणी यांनी ऊर्जा आणि तंत्रज्ञान या दोन्ही क्षेत्रांमध्ये 'स्वायत्तते'साठी जोरदार युक्तिवाद करताना म्हटले, "मध्यपूर्वेतील अलीकडील संघर्ष आणि पायाभूत सुविधांवर झालेले हल्ले यांतून एक गोष्ट अधिकच स्पष्ट झाली आहे, ती म्हणजे ऊर्जा सुरक्षा आणि डिजिटल सुरक्षा हे आता स्वतंत्र घटक राहिलेले नाहीत. तर, आता ते देशाच्या ताकदीचे दुहेरी आधारस्तंभ बनले आहेत."

# अमिषा पटेलने 'गदर 3' ची दिली अपडेट



अभिनेता सनी देओल आणि अभिनेत्री अमिषा पटेल यांच्या 'गदर' आणि 'गदर २' या चित्रपटांना प्रेक्षकांनी भरभरून प्रेम दिले. या चित्रपटांनी बॉक्स ऑफिसवर मोठी कमाई केली आहे. तारा सिंग (सनी देओल) आणि सकिना (अमिषा पटेल) यांची जोडी प्रेक्षकांच्या आजही पसंतीस उतरले. यातच आता अमिषा पटेलने 'गदर ३' चित्रपटाबाबत अपडेट दिली आहे. अमिषा पटेलने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म X आणि इंस्टाग्रामवर एक पोस्ट शेअर करत 'गदर ३' नक्कीच बनवला जाईल, अशी पुष्टी केली आहे. अमिषाने म्हटले आहे की, "गदर ३ नक्कीच येणार आहे आणि जेव्हा तो येईल, तेव्हा थिएटरमध्ये धुमाकूळ माजेल. प्रेक्षकांचे प्रेम आणि देवाच्या आशीर्वादामुळे 'गदर' सारख्या ब्रँडसाठी ५०० कोटींचे कलेक्शन आता एक सामान्य आकडा झाला आहे". यावेळी चित्रपटाचा आवाका आणि पटकथा पूर्वीपेक्षा अधिक भव्य आणि धमाकेदार असेल, असेही तिने स्पष्ट केले. 'गदर ३' व्यतिरिक्त अमिषा पटेल तिच्या गाजलेल्या 'हमराज' चित्रपटाच्या सिक्वेलमुळेही चर्चेत आहे. निर्माते रतन जैन यांनी 'हमराज २' साठी योग्य पटकथेचा शोध सुरू असल्याचे संकेत दिले आहेत. त्यामुळे आगामी काळात अमिषाचे एकापाठोपाठ एक मोठे चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. याचदरम्यान अमिषाने केलेल्या घोषणेनंतर आता 'गदर ३' मध्ये तारा सिंग नक्की काय धमाका करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# रकुल प्रीतची जंगल सफारी वादात



अभिनेत्री रकुल प्रीत सिंगचा सोशल मिडियावर एक व्हिडिओ व्हायरल होत आहे. मात्र एका चुकीमुळे तिच्यावर नेटकऱ्यांनी टीका केली आहे. हा व्हिडिओ गुजरातच्या गीर नॅशनल पार्कमधील आहे, ज्यामध्ये रकुल 'बॅन झोन'मध्ये (प्रतिबंधित क्षेत्र) फिरताना दिसत आहे. रकुल तिच्या 'पती पत्नी और वो २' या चित्रपटाच्या प्रमोशननिमित्त गुजरातच्या प्रसिद्ध गिर नॅशनल पार्कमध्ये पोहोचली होती. तिच्यासोबत आयुष्मान खुराना, वामिका गब्बी आणि सारा अली खान हे कलाकारही तिथे गेले होते. मात्र, या सफारीमधील एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर चांगलाच वाद निर्माण झाला. या व्हिडिओमध्ये रकुल अभयारण्यात सक्ती असलेल्या ठिकाणी सफारी जीपच्या बाहेर फिरताना दिसत असल्याचं दिसलं. या व्हिडीओमुळे नेटकऱ्यांनी तिला ट्रोल करण्यास सुरुवात केली. गिर नॅशनल पार्क आणि सासन अभयारण्यासारख्या संरक्षित जंगल भागात सफारीदरम्यान पर्यटकांना गाडीतून उतरायला परवानगी नसते. त्यामुळे रकुलचा व्हिडिओ समोर येताच तिने नियम मोडल्याची चर्चा रंगली.

# थलपतीच्या शपथविधीनंतर त्रिशाची पहिली पोस्ट



तामिळनाडूमध्ये व्हीसीके आणि आययूएमएलच्या पाठिंब्याने, थलपती विजय यांच्या टीव्हीके पक्षाने आता सरकार स्थापन केले आहे. विजय यांनी तामिळनाडूच्या मुख्यमंत्रीपदी शपथ घेतली. टीव्हीकेच्या नऊ आमदारांनीही मंत्री म्हणून शपथ घेतली. या सोहळयाला अभिनेत्री त्रिशा कृष्णन हिने देखील हजेरी लावली होती. या कार्यक्रमातील त्रिशाच्या लुकने अनेकांचे लक्ष वेधून घेतले. यानंतर आता तिने या कार्यक्रमादरम्यानचे काही फोटो आणि व्हिडिओ सोशल मिडियावर शेअर केले आहेत. या पोस्टला तिने दिलेल्या कॅप्शनने अनेकांचं लक्ष वेधलं आहे. अभिनेत्रीने नुकतच इन्स्टाग्रामवर ब्लू रंगाच्या सिल्क साडीतले काही फोटो शेअर केले आहे. सोन्याच्या जरीची नक्षी असलेल्या या साडीवर तिने ऑफ व्हाइट रंगाचा ब्लाऊज आणि साधे दागिने परिधान केले होते. या पोस्टला त्रिशाने 'प्रेम कायम सगळ्यात प्रभावी असतं' अशी कॅप्शन दिली आहे. अनेकांनी या पोस्टचा संबंध विजयशी लावला आहे. त्रिशा कृष्णन आणि विजय यांच्या रिलेशनशिपच्या चर्चा अनेक वर्षांपासून सुरू आहेत. दोघांनीही अनेक सुपरहिट तमिळ चित्रपटांमध्ये एकत्र काम केलं आहे. मात्र, या चर्चांवर दोघांनीही कधीही भाष्य केलेलं नाही. अलीकडेच विजय यांच्या पत्नीने संगीता यांनी घटस्फोटाची याचिका दाखल करत विजय यांचे लोकप्रिय अभिनेत्रीसह विवाह बाह्य संबंध असल्याच्या दावा केला होता. तेव्हापासून या दोघांबद्दल चर्चात अधिक सुरू झाल्या. अशातच आता विजय यांच्या शपथविधी सोहळ्यानंतर त्रिशाने पोस्ट शेअर करत लिहिलेल्या कॅप्शनने पुन्हा एकदा चर्चांनी जोर धरला आहे. दरम्यान, सोशल मीडियावर त्रिशाच्या या पोस्टवर चाहत्यांकडून मोठ्या प्रमाणात प्रतिक्रिया उमटताना दिसत आहेत. काहींनी तिच्या लूकचे कौतुक केले असून, तर काहींनी कॅप्शनमधून तिने अप्रत्यक्ष संकेत दिल्याची चर्चा सुरू केली आहे. विजय यांच्या राजकीय प्रवासातील हा मोठा टप्पा मानला जात असताना, त्रिशाची उपस्थितीही चर्चेचा विषय ठरली. शपथविधी सोहळ्यातील अनेक फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. विशेष म्हणजे विजय आणि त्रिशा एकाच फ्रेममध्ये दिसलेल्या काही क्षणांनी चाहत्यांचे लक्ष वेधले. अनेक नेटकऱ्यांनी या पोस्टवर हार्ट आणि फायर इमोजींचा वर्षाव केला आहे. काही चाहत्यांनी मात्र या चर्चांना फक्त अफवा असल्याचेही म्हटले आहे. आता त्रिशाच्या या पोस्टनंतर सोशल मीडियावर पुन्हा एकदा विजय-त्रिशा यांच्या नात्याबाबत चर्चांना उधाण आले आहे. याशिवाय, त्रिशाच्या या पोस्टनंतर तमिळ चित्रपटसृष्टीतही विविध चर्चांना सुरुवात झाली आहे. अनेक सेलिब्रिटी आणि चाहत्यांनी तिच्या पोस्टला लाईक आणि कमेंट करत प्रतिक्रिया दिल्या आहेत. विजय यांच्या राजकीय यशानंतर त्यांच्या वैयक्तिक आयुष्याबाबतही लोकांमध्ये उत्सुकता वाढलेली दिसत आहे.

# मुंबई इंडियन्स IPL मधून बाहेर!

## शेवटच्या चेंडूवर आरसीबीचा थरारक विजय

**महाईन्यूज । मुंबई**

**आयपीएल २०२६ स्पर्धेतील ५४ वा सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि मुंबई इंडियन्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. रायपूरच्या मैदानावर पार पडलेल्या या सामन्यात दोन्ही संघांमध्ये अटीतटीची लढत पाहायला मिळाली. मुंबई इंडियन्सने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघासमोर विजयासाठी १६७ धावांचे आव्हान ठेवले होते.**



या आव्हानाचा पाठलाग करताना मुंबईने सुरुवातीला रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला मोठे धक्के दिले. पण शेवटी कृणाल पंड्या खंबीरपणे उभा राहिला. गेल्या सामन्यातही कृणाल पंड्याने शेवटपर्यंत झुंज दिली होती. पण विजय थोडक्यात हुकला होता. पण यावेळी त्याने आपल्या जुन्या संघाविरुद्ध खेळताना दमदार अर्धशतकी खेळी केली. दरम्यान शेवटच्या षटकात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने हा सामना २ गडी धावा राखून आपल्या नावावर केला.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाला हा सामना जिंकण्यासाठी १६७ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना विराट कोहली शून्यावर माघारी परतला. तर जेकब बेथेलने २७ धावांची खेळी केली. देवदत्त पडिक्कलने १२ धावांची खेळी केली. रजत पाटीदारने ८ धावा केल्या. पण कृणाल पंड्याने सामना फिरवला. त्याने ७३ धावांची खेळी केली. जितेश शर्मा १८ धावा करून माघारी परतला. शेवटच्या षटकात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने हा सामना २ गडी राखून विजय मिळवला.




# RCB ला मोठा झटका; पंचांशी हुज्जत घालणे मुख्य प्रशिक्षकांना पडले महागात

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**रजत पाटीदारच्या नेतृत्वाखालील आरसीबीने मुंबई इंडियन्सविरुद्ध २ विकेट्सने विजय मिळवला. पण त्या सामन्यादरम्यान नियमांचे उल्लंघन केल्यामुळे कोचला मात्र फटका बसला आहे. आरसीबीचे मुख्य प्रशिक्षक अँडी फ्लॉवर यांना दंड ठोठावण्यात आला असून, त्यांच्या सामना शुल्कात १५ टक्क्यांची कपात करण्यात आली आहे. आयपीएल २०२६ मधील अशा प्रकारची ही पहिलीच घटना आहे. या हंगामात आतापर्यंत केवळ खेळाडू किंवा संघाच्या कर्णधारांनाच दंड ठोठावण्यात आला होता. संघाच्या मुख्य प्रशिक्षकांना देण्यात आलेली ही पहिलीच शिक्षा आहे, पण नेमकं काय घडलं ते जाणून घेऊया.**



रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने मुंबई इंडियन्सचा पराभव करत प्लेऑफच्या दिशेने महत्त्वाचं पाऊल टाकलं. मुंबईला पराभूत केल्यानंतर आरसीबीचा संघ १४ गुणांसह आणि कमालीच्या नेट रन रेटसह पहिल्या स्थानी पोहोचला आहे. आता आरसीबीला प्लेऑफ गाठण्यासाठी फक्त एकच सामना जिंकायचा आहे. तर मुंबई इंडियन्सचा संघ स्पर्धेबाहेर झाला आहे.

आता प्रश्न असा आहे की, अँडी फ्लॉवर यांना दंड का ठोठावण्यात आला? याचं कारण म्हणजे पंचांशी घातलेली हुज्जत. आरसीबीच्या डावाच्या १८ व्या षटकादरम्यान कोच अँडी फ्लॉवरचा चौथ्या पंचांसोबत जोरदार वाद झाला. परिणामी, त्यांना दंड ठोठावण्यात आला. आयपीएलने जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे की, अँडी फ्लॉवरने आपला गुन्हा कबूल केला आहे. आयपीएल आचारसंहितेच्या कलम २.३ अंतर्गत त्यांना दोषी ठरवण्यात आलं.

हा संपूर्ण प्रकार कृणाल पांड्याच्या संबंधित एका वादग्रस्त बाउंड्रीच्या निर्णयानंतर घडला. मुंबई इंडियन्सचा गोलंदाज अल्लाह गझनफरच्या गोलंदाजीवर कृणालने चेंडू लाँग-ऑनच्या दिशेने खेळला. तिथे उपस्थित असलेल्या नमन धीरने सीमारेषेजवळ चेंडू पकडला. तिलक वर्मादेखील तिथे उपस्थित होता. पण नमनचा सीमारेषेबाहेर तोल जाणार कळताच त्याने चेंडू फेकला, पण तिलक तो चेंडू टिपू शकला नाही.

दरम्यान, नमनचा एक बूट चुकून दुसऱ्या बुटाला लागून सीमारेषेवरील कुशनला लागला असावा, त्यामुळे षटकार देण्यात आला पाहिजे असं अँडी फ्लॉवरचं म्हणणं होतं. पण, रिप्लेमध्ये दिसलं की, प्रयत्नादरम्यान नमन धीरने कुशनला स्पर्श केला नव्हता. कृणालला क्रॅम्प येत असल्यामुळे त्याने धावण्याचा प्रयत्न केला नाही. याचा अर्थ तो निर्धाव चेंडू होता.

दरम्यान, अँडी फ्लॉवरचा व्हिडिओ समोर आला आहे, ज्यामध्ये ते पंचांशी रागाने बोलताना दिसत आहेत. सामन्यानंतर, फ्लॉवर यांनी चौथ्या पंचांशी रागाने बोलण्याची आपली चूक कबूल केली आहे आणि सामनाधिकारी अमित शर्मा यांनी दिलेली शिक्षा स्वीकारली आहे. आयपीएलच्या नियमांनुसार, लेव्हल १ उल्लंघनासाठी दिलेली शिक्षा अंतिम आणि बंधनकारक असते.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज™

epaper.mahaenews.com

ePaper

। मंगळवार ।
दि. 12 मे 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# गाळ, कचरा आणि झुडपांमुळे नाल्यांचा प्रवाह विस्कळीत...

महाईन्यूज ।
पिंपरी- चिंचवड

पावसाळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असताना पिंपरी-चिंचवड शहरातील प्रमुख नाले आणि उपनाले मोठ्या प्रमाणात तुंबलेल्या अवस्थेत असल्याचे वास्तव समोर आले आहे. साचलेला गाळ, टाकण्यात येणारा कचरा, राडारोडा, अन झुडपे यामुळे अनेक नाल्यांच्या प्रवाहात अडथळा आला आहे. पावसाळ्यापूर्वी नाले सफाईचे काम पूर्ण न झाल्यास शहरातील अनेक भागात पूरस्थितीचा धोका उद्भवू शकतो. एका बाजूला स्मार्ट सिटीचे स्वप्न दाखवले जात असताना दुसऱ्या बाजूला शहरातील नालेच गुदमरल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.'

शहरातील अनेक मुख्य नाले आणि उपनाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात गाळ साचल्याने प्रवाह विस्कळीत झाला आहे. अनेक ठिकाणी नाल्यांमध्ये झुडपे वाढलेली असून काही भागांत राडारोडा आणि चिखल दिवसेंदिवस नाल्यांच्या कडेलाच पडून असल्याचे दिसत आहे. त्यामुळे मुसळधार पावसात हा गाळ पुन्हा नाल्यात वाहून जाऊन परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे. उपनगरे व एमआयडीसी परिसरासह अनेक भागांतील प्रमुख नाले ,स्ट्रॉम वॉटर निचरा होण्यासाठीचे छोटे नाले पूर्ण क्षमतेने वाहू शकतील अशी स्थिती नसल्याने पावसाचे पाणी थेट रस्ते, सोसायट्या आणि व्यापारी आस्थापनांमध्ये शिरण्याची भीती व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे शहरातील अनेक नाला परिसरामध्ये उद्याने असल्याने त्या ठिकाणी सुरक्षेच्या उपाययोजना अत्यंत अपुऱ्या असल्याचे चित्र आहे.

> ❝ पावसाळ्यापूर्वी नागरिकांना कोणताही त्रास होऊ नये, यासाठी नालेसफाईची कामे युद्धपातळीवर सुरू आहेत. ज्या ठिकाणी अडथळे, गाळ आणि कचऱ्याची समस्या आहे. तेथे तातडीने उपाययोजना करण्यात येत असून लवकरच सर्व कामे पूर्ण केली जातील.
>
> **- शांताराम माने, आरोग्य सहायक अधिकारी आरोग्य विभाग**

काही ठिकाणी वळणाच्या ठिकाणी नाल्यांचे कठडे तुटलेल्या अवस्थेत असून त्यांची दुरुस्ती अद्याप करण्यात आलेली नाही. त्यामुळे वहानचालक,शतपावलीसाठी येणारे ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांसाठी हे नाले धोकादायक ठरत आहेत; तसेच काही नाल्यांलगतच विद्युत खांब उभे करण्यात आलेले आहेत. मुसळधार पावसात नाले तुडुंब भरल्यास पाणी विद्युत यंत्रणेला स्पर्श करून विजेचा प्रवाह उतरण्याची शक्यता निर्माण होऊ शकते. त्यामुळे पाण्यातून मार्ग काढणाऱ्या नागरिकांच्या जीवितालाच धोका निर्माण होण्याची भीती व्यक्त होत आहे.






# ताथवडे-पुनावळे अंडरपासची 'कोंडी'

## कोणाचेच लक्ष का नाही? नागरिक संतप्त, प्रशासन-लोकप्रतिनिधींवर गंभीर प्रश्न

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील पुणे-मुंबई महामार्गावर ताथवडे आणि पुनावळे अंडरपास भागात दररोजची वाहतूक कोंडी, पावसाळ्यात होणारे पाणी साचणे आणि अपघाताचा वाढता धोका यामुळे नागरिक अक्षरशः त्रस्त झाले आहेत. परिस्थिती दिवसेंदिवस बिघडत असताना देखील स्थानिक पातळीवरील लोकप्रतिनिधी आणि संबंधित यंत्रणांची भूमिका पूर्णपणे निष्क्रिय असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.**



सोसायटीधारक, वाहनचालक आणि स्थानिक रहिवाशांमध्ये तीव्र संतापाची भावना आहे. "कर भरायचा आमच्याकडून आणि रोज जीव मुठीत घेऊन प्रवास करायचा का?" असा थेट सवाल नागरिक विचारत आहेत. दररोज सकाळ-संध्याकाळ या भागात होणारी प्रचंड वाहतूक कोंडी ही आता नित्याचीच बाब झाली आहे.

महत्वाचे म्हणजे, हा परिसर जर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या (NHAI) अखत्यारीत येत असेल, तर स्थानिक नगरसेवक, आमदार आणि खासदार यांनी समन्वय साधून ठोस उपाययोजना करण्यासाठी दबाव टाकणे अपेक्षित आहे. मात्र प्रत्यक्षात परिस्थिती वेगळीच दिसते. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, जबाबदार लोकप्रतिनिधी प्रत्यक्ष ठिकाणी भेट देऊन समस्या समजून घेण्यासाठीही पुढे येताना दिसत नाहीत.

पावसाळ्यात या अंडरपासमध्ये पाणी साचून परिस्थिती आणखी गंभीर बनते. अनेक वेळा वाहनांचे मोठे नुकसान झाले असून, काही वेळा नागरिकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागतो. तरीही कायमस्वरूपी तोडगा किंवा स्पष्ट कृती आराखडा अद्याप जाहीर झालेला नाही.

नागरिकांचा स्पष्ट प्रश्न आहे — फक्त आश्वासने पुरेशी आहेत का? की प्रत्यक्ष काम, नियोजन आणि वेळबद्ध उपाययोजना केव्हा दिसणार? ताथवडे–पुनावळे अंडरपास परिसरातील ही कोंडी आता केवळ वाहतुकीचा प्रश्न राहिलेला नसून, प्रशासनाच्या आणि लोकप्रतिनिधींच्या जबाबदारीवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण करणारी समस्या बनली आहे. नागरिक आता तात्पुरत्या उपायांपेक्षा ठोस आणि दीर्घकालीन समाधानाची मागणी करत आहेत.

### वाहतूक कोंडीत अडकलेल्या रुग्णाची परवड..

पुनावळे येथील अंडरपास जवळ मध्यरात्रीच्या सुमारास भीषण वाहतूक कोंडी निर्माण झाली असून, यात सामान्य नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत. रात्रीचे १२:३० वाजले तरीही रस्त्यावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. विशेष म्हणजे, या कोंडीमध्ये रुग्णालयातून घरी परतणारे रुग्णही अडकले असून त्यांना अर्ध्या तासाहून अधिक काळ एकाच जागेवर ताटकळत राहावे लागत आहे. प्रशासकीय नियोजनाच्या अभावामुळे आपत्कालीन परिस्थितीतही रस्ता मोकळा मिळत नसल्याने नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. या गंभीर परिस्थितीवर संताप व्यक्त करताना एका वाहनचालकाने सांगितले की, "प्रशासकीय कर्मचारी असोत वा पोलीस, कोणालाही सामान्य जनतेच्या त्रासाची पडलेली नाही." घटनास्थळी वाहतूक नियमन करण्यासाठी एकही कर्मचारी उपस्थित नसल्याने बेशिस्त वाहतुकीचा प्रश्न गंभीर झाला आहे. "केवळ कर भरायचा आणि हा त्रास सहन करायचा का?" असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. ही कोंडी सोडवण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी पुनावळेतील रहिवाशांकडून केली जात आहे.

## कायदा-सुव्यवस्थेसाठी नागरिकांनी सहकार्य करावे; आमदार महेश लांडगे

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने सोमवारी पहाटे कुदळवाडी आणि परिसरातील अनधिकृत धार्मिक स्थळांवर बुलडोझर कारवाई केली. या पार्श्वभूमीवर आमदार महेश लांडगे यांनी प्रतिक्रिया देत, "देशविघातक प्रवृत्तींना आश्रय देणाऱ्या बेकायदेशीर प्रार्थनास्थळांवर कारवाई होणे आवश्यक होते. राष्ट्र सुरक्षेच्या दृष्टीने कोणतीही तडजोड केली जाणार नाही," असे स्पष्ट केले.**





लांडगे म्हणाले की, या कारवाईदरम्यान काही हिंदू धार्मिक स्थळांचेही नुकसान झाल्याची खंत आहे. मात्र, संबंधित स्थळे अधिकृत जागी आणि नियमानुसार पुनर्स्थापित करण्यासाठी पुढाकार घेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

त्यांनी पुढे नमूद केले की, राष्ट्र सुरक्षा, इंद्रायणी नदी प्रदूषण नियंत्रण आणि पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने फेब्रुवारी २०२५ मध्ये या भागात मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणविरोधी कारवाई करण्यात आली होती. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने ही कारवाई करण्याचे धाडस दाखवले, असेही त्यांनी म्हटले.

कुदळवाडी परिसर आगामी काळात अतिक्रमणमुक्त करून 'ग्रोथ हब' म्हणून विकसित करण्याचा शासनाचा मानस असल्याचे सांगताना लांडगे यांनी, "कायद्यापेक्षा कोणीही मोठे नाही. देशविघातक प्रवृत्तींना आश्रय देणाऱ्या कोणत्याही बेकायदेशीर बांधकामाला आम्ही समर्थन देणार नाही," अशी ठाम भूमिका मांडली.

तसेच, परिसरातील नागरिकांनी कोणताही धार्मिक तणाव निर्माण न करता पोलीस आणि महापालिका प्रशासनाला सहकार्य करावे, तसेच पिंपरी-चिंचवड शहरातील कायदा व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले."जय श्रीराम... जय संविधान...!" अशा घोषवाक्यासह त्यांनी आपली प्रतिक्रिया समाप्त केली आहे.

# पुणे RMC असोसिएशनकडून अद्ययावत कामकाजाच्या वेळा जाहीर!

## आरएमसी उद्योगात नियोजनबद्ध सेवा व कार्यक्षम पुरवठ्यासाठी नवे वेळापत्रक लागू


**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पुणे- पिंपरी-चिंचवड परिसरातील PUNE RMC ASSOCIATION यांनी READY MIX CONCRETE (RMC) उद्योगासाठी नवीन आणि अद्ययावत कामकाजाच्या वेळा जाहीर केल्या आहेत. उद्योगातील सेवा अधिक सुरळीत, नियोजित आणि कार्यक्षम पद्धतीने चालाव्यात या उद्देशाने हे बदल करण्यात आले आहेत.**



जाहीर केलेल्या माहितीनुसार, आठवड्यातील कामकाजाच्या वेळा दोन वेगवेगळ्या सत्रांमध्ये विभागण्यात आल्या आहेत. सोमवार, मंगळवार, गुरुवार आणि शुक्रवार: या दिवशी सकाळी ११:०० ते सायंकाळी ५:०० या वेळेत कामकाज सुरू राहणार आहे. तसेच, बुधवार, शनिवार आणि रविवार: या दिवशी सकाळी ६:०० ते सायंकाळी ५:०० या वेळेत सेवा उपलब्ध राहील.

या निर्णयामुळे बांधकाम क्षेत्रातील RMC पुरवठा अधिक नियोजित पद्धतीने होईल तसेच ग्राहकांना वेळेत सेवा मिळण्यास मदत होईल, असे असोसिएशनकडून स्पष्ट करण्यात आले आहे. उद्योगातील सर्व घटकांना या अधिकृत वेळांचे पालन करण्याचे आवाहनही Pune RMC Association यांनी केले आहे, जेणेकरून संपूर्ण प्रणाली अधिक कार्यक्षम आणि सुरळीतपणे चालू राहील.




# महापौर चषक स्पर्धेत पुरुष गटात वाघजाई तर महिला गटात राजमाता जिजाऊ संघ विजेता

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**'महापौर चषक ही केवळ स्पर्धा नसून राज्यातील नवोदित खेळाडूंना मोठ्या व्यासपीठावर स्वतःची क्षमता सिद्ध करण्याची संधी आहे. पिंपरी चिंचवड शहर क्रीडा संस्कृतीला चालना देणारे शहर म्हणून ओळख निर्माण करत आहे, आणि अशा स्पर्धांमधून भविष्यातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडतील, असा विश्वास आहे, ' असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले. या स्पर्धेत पुरुष गटात वाघजाई तर महिला गटात राजमाता जिजाऊ संघ विजेता ठरला आहे.**




पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'महापौर चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा २०२६' चा समारोप व पारितोषिक वितरण महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी आमदार महेश लांडगे, विधानपरिषद सदस्य माजी मंत्री सचिन अहिर, क्रीडा, कला, साहित्य आणि सांस्कृतिक सभापती कैलास कुटे, नगरसदस्या भीमाताई फुगे, नगरसदस्य शीतल उर्फ विजय शिंदे, सागर गवळी, दत्ता गव्हाणे, सचिन तापकीर, माजी नगरसदस्य विलास मेडिगिरी, पंडितराव गवळी, सहाय्यक कामगार आयुक्त अश्विनी साकोरे, उपायुक्त पंकज पाटील यांच्यासह क्रीडाप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या स्पर्धेत पुरुष गटात रत्नागिरीच्या वाघजाई कबड्डी संघाने शानदार कामगिरी करत महापौर चषक पटकावला, तर महिला गटात पुण्याच्या राजमाता जिजाऊ संघाने विजेतेपदावर आपले नाव कोरले.

पुरुष गटात वाघजाई कबड्डी संघ रत्नागिरी प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला तर शिवमुद्रा संघ कोल्हापूर द्वितीय, बारामती स्पोर्ट क्लब बारामती तृतीय आणि सतेज संघ पुणे चतुर्थ क्रमांकावर राहिले.

महिला गटात राजमाता जिजाऊ संघ पुणे यांनी प्रथम क्रमांक पटकावत विजेतेपद मिळवले तर शिवशक्ती संघ मुंबई द्वितीय, बारामती स्पोर्ट क्लब बारामती तृतीय आणि धर्मवीर कबड्डी संघ नंदुरबार यांनी चतुर्थ क्रमांक मिळवला.

स्पर्धेतील वैयक्तिक पारितोषिकांमध्ये पुरुष गटात साहिल पाटील यांना "सर्वोत्कृष्ट खेळाडू" म्हणून बुलेट प्रदान करण्यात आली तर अर्जुन तडस यांना पंचाहत्तर हजार रुपये आणि चषक देऊन गौरविण्यात आले. "सर्वोत्कृष्ट चढाई" पुरस्कार अजिंक्य पवार यांना चेतक गाडी देऊन प्रदान करण्यात आला तर अजित चव्हाण यांना पन्नास हजार रुपये आणि चषक देण्यात आला. "सर्वोत्कृष्ट पकड" या प्रकारात शुभम शिंदे यांना चेतक गाडी तर वैभव रबाडे यांना पन्नास हजार रुपये व चषक प्रदान करण्यात आला.

महिला गटात निकिता पडवळ यांना "सर्वोत्कृष्ट महिला खेळाडू" म्हणून चेतक गाडी देण्यात आली तर मृणाली भुवड यांना पंचाहत्तर हजार रुपये व चषक प्रदान करण्यात आला. "सर्वोत्कृष्ट चढाई" प्रकारात सोनाली शिंगटे यांना चेतक गाडी तर मनिषा बारटक्के यांना पन्नास हजार रुपये व चषक देण्यात आला. "सर्वोत्कृष्ट पकड" पुरस्कार ऋतुजा तिगडे यांना चेतक गाडी आणि हर्षदा सोनवणे यांना पन्नास हजार रुपये व चषक देऊन सन्मानित करण्यात आले.



यावेळी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर नाव उज्ज्वल करणारे अर्जुन आणि छत्रपती पुरस्कार विजेत्या शकुंतला खटावकर, छत्रपती पुरस्कार विजेते सूर्यकांत पाटील, संगीता सोनावणे, सायली क्रिपाळे, अमरदीप चांदुगुडे, माजी प्रो कबड्डी खेळाडू सुनील लांडे आणि माजी आंतरराष्ट्रीय खेळाडू रामदास लांडगे यांचा देखील सन्मान करण्यात आला.

या स्पर्धेच्या निमित्ताने राज्यभरातील अनेक नामांकित खेळाडू आणि क्रीडाप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

# विकसित भारत २०४७ च्या स्वप्नपूर्तीसाठी योगदान द्या: ज्योतिरादित्य सिंधिया

## शिक्षण विश्व: डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचा (डीपीयु) 17 वा पदवीप्रदान समारंभ

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी, पुणे (अभिमत विद्यापीठ) येथे 17 वा पदवीप्रदान समारंभ उत्साहात संपन्न झाला. या समारंभासाठी मा. श्री. ज्योतिरादित्य एम. सिंधिया, केंद्रीय दळणवळण मंत्री आणि ईशान्य क्षेत्र विकास मंत्री, भारत सरकार हे पाहुणे म्हणून उपस्थित होते.**




> पदवीप्रदान समारंभ हा संपूर्ण 'डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ' परिवारासाठी अत्यंत अभिमानाचा क्षण आहे. 2003 मधील स्थापनेपासून आजवर, हे विद्यापीठ शैक्षणिक गुणवत्ता, नवनवीन प्रयोग (INNOVATION), आरोग्य सेवा आणि सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी कटिबद्ध असलेले एक बहुविद्याशाखीय केंद्र म्हणून नावारूपास आले आहे. भारतीय मूल्यांची जोपासना करत जागतिक दर्जाचे शैक्षणिक वातावरण निर्माण करण्याच्या ध्येयानेच आमच्या या प्रगतीची वाटचाल झाली आहे.
>
> – डॉ. पी. डी. पाटील, कुलपती.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा. डॉ. पी. डी. पाटील कुलपती, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी, पुणे यांनी भूषविले. या कार्यक्रमात मा. डॉ. (ब्रिगे.) अमरजित सिंग (निवृत्त) माजी प्रभारी कुलगुरू, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी, पुणे आणि माजी अधिष्ठाता, डॉ. डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय आणि संशोधन केंद्र, पिंपरी, पुणे तसेच मा. डॉ. ए. एल. काकराणी वैद्यकीय क्षेत्रातील प्रख्यात प्राध्यापक तसेच संचालक – शैक्षणिक सहयोग विभाग डॉ. डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय व संशोधन केंद्र, पिंपरी, पुणे. या दोन दिग्गज व्यक्तींना त्यांच्या अतुलनीय योगदानाबद्दल 'डॉक्टर ऑफ सायन्स' ही मानद पदवी देऊन गौरविण्यात आले.

या समारंभात विविध विद्याशाखांमधील परीक्षांमध्ये प्रावीण्य संपादन केलेल्या 30 विद्यार्थ्यांना या वेळी सुवर्ण पदके देऊन सन्मानित करण्यात येईल. विविध विद्याशाखेतील 18,720 स्नातकांना पदवी प्रदान करण्यात आली असून यामध्ये 48 विद्यावाचस्पती (पीएच. डी.), 16,752 पदव्युत्तर पदवी, 1,905 पदवी व 15 पदविका या अशा एकूण 9 विद्याशाखेतील विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली.

यावेळी मा. डॉ. सौ. भाग्यश्री पी. पाटील (प्र-कुलपती, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी, पुणे आणि अध्यक्षा, ज्ञान प्रसाद ग्लोबल युनिव्हर्सिटी, पुणे), मा. डॉ. सोमनाथ पी. पाटील (प्र-कुलपती, ज्ञान प्रसाद ग्लोबल युनिव्हर्सिटी, पुणे आणि सचिव, डॉ. डी. वाय. पाटील युनीटेक सोसायटी, पुणे), मा. डॉ. एन. जे. पवार (कुलगुरू डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी, पुणे), मा. डॉ. सौ. स्मिता जाधव (प्र-कुलगुरू, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी, पुणे आणि सचिव, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ सोसायटी, पुणे) तसेच मा. डॉ. यशराज पी. पाटील (विश्वस्त आणि खजिनदार, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ सोसायटी, पुणे) यांच्यासह इतर मान्यवर, प्राध्यापक सदस्य, विद्यार्थी आणि पालक यावेळी उपस्थित होते.

### पदवीदान समारंभ नव्या पर्वाची सुरवात...

मा. श्री. ज्योतिरादित्य एम. सिंधिया म्हणाले – आज पदवीदान समारंभात शैक्षणिक वस्त्र परिधान करून उभ्या असलेल्या विद्यार्थ्यांकडे पाहताना मला विकसित भारत २०४७ चे भावी शिल्पकार दिसत आहेत. विकसित भारत २०४७च्या स्वप्नपूर्तीसाठी युवकांनी परिवर्तनाचे नेतृत्व करत सक्रिय योगदान द्यावे. पदवीदान समारंभ हा शेवट नसून, तो आपल्या आयुष्याच्या नव्या प्रवासाची सुरुवात आहे डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी, पुणे येथे मिळालेले शिक्षण, संस्कार आणि अनुभव तुम्हाला आत्मविश्वासाने निर्णय घेण्याची, बदलांना सामोरे जाण्याची आणि राष्ट्रनिर्मितीत अर्थपूर्ण योगदान देण्याची ताकद देतील.

### शिक्षकांचे योगदान स्मरणात ठेवा :

आज भारत एका ऐतिहासिक व निर्णायक टप्प्यावर उभा आहे. आरोग्यसेवा, नवोन्मेष, तंत्रज्ञान आणि उद्योजकता या क्षेत्रांमध्ये अफाट संधी उपलब्ध आहेत. मी प्रत्येक विद्यार्थ्याला आवाहन करतो की, केवळ नोकरीचा विचार करू नका, तर आपल्या कार्यातून समाजावर आणि देशावर काय सकारात्मक प्रभाव पडेल याचाही विचार करा. धाडसाने जोखीम घ्या, सातत्याने नवे शिकत राहा, आपल्या संस्थेशी कायम जोडलेले राहा आणि आपल्या या यशस्वी प्रवासामागे असलेल्या पालक व शिक्षकांचे योगदान सदैव स्मरणात ठेवा, असे ज्योतिरादित्य एम. सिंधिया म्हणाले.

# एमआयटी आळंदीचा विद्यार्थी आज आंतरराष्ट्रीय संगीतविश्वात झळकतोय

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**आळंदी येथील एमआयटी कॉलेज ऑफ आळंदी मधील २०१२-१३ च्या बी.एससी. (कॉम्प्युटर सायन्स) शाखेचा विद्यार्थी आशुतोष सुरजूसे याने आपल्या अथक मेहनतीच्या जोरावर संगीतविश्वात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. कॉलेजमध्ये शिक्षण घेत असतानाच त्याने संगीत क्षेत्रात मोठी झेप घेत महाविद्यालयाचे नाव राज्यासह देशभर पोहोचवले.**



आशुतोषच्या यशामागे त्याची जिद्द, सातत्य आणि संगीतावरील निस्सीम प्रेम आहे. कॉलेजचे डायरेक्टर डॉ वाफरे सर यांचे त्याला विशेष मार्गदर्शन लाभले. तसेच अमित टाळे सर आणि मयुरी बापट मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली त्याने अनेक संगीत स्पर्धांमध्ये सहभाग घेत उल्लेखनीय यश मिळवले.

आशुतोषचा संगीत प्रवास घरातूनच सुरू झाला. त्याचे पहिले गुरु म्हणजे त्याचे वडील अरुण सुरजूसे. वडिलांना गाताना पाहूनच त्याच्या मनात संगीताची आवड निर्माण झाली. त्याची आई संगीत विशारद असल्यामुळे त्याला शास्त्रीय संगीताचे धडे घरातूनच मिळाले. तसेच त्याचे मामा विठ्ठल दानव आणि आजोबा स्वर्गीय गणपतराव दानव यांनी त्याला तबल्याचे संस्कार दिले.

पुण्यात डॉ. रवींद्र घांगुर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली त्याने संगीत विशारद पदवी पूर्ण केली. त्याचबरोबर प्रसिद्ध शास्त्रीय गायक राहुल देशपांडे यांच्याकडे एक वर्ष संगीताची तालीम घेत त्याने आपल्या गायकीला अधिक धार दिली.

आजपर्यंत आशुतोषने तब्बल १००० हून अधिक कार्यक्रम सादर केले आहेत. अनेक मोठ्या संगीत कंपन्यांसाठी त्याने पार्श्वगायन केले असून त्यामध्ये झी म्युझिक कंपनी आणि इतर नामांकित संगीत कंपन्यांचा समावेश आहे. विविध ओटीटी प्लॅटफॉर्मवर त्याने ६ गाण्यांना आवाज दिला आहे.

### आशुतोषचा संगीत जीवनप्रवास...

टेलिव्हिजन क्षेत्रातही आशुतोषने आपली खास छाप उमटवली आहे. झी टॉकीज आणि झी मराठी वरील विशेष चरित्र कार्यक्रमांमध्ये त्याने गायक म्हणून काम केले आहे. यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज चरित्र, भगवान श्रीकृष्ण चरित्र, श्री गणेश चरित्र आणि छत्रपती संभाजी महाराज चरित्र या कार्यक्रमांचा समावेश आहे. तसेच स्टार प्रवाह वरील सहकुटुंब सहपरिवार या मालिकेत त्याने चार मिनिटांचा विशेष केमिओ साकारला. सध्या आशुतोष मॉरिशसमध्ये एका आंतरराष्ट्रीय बँडसोबत कार्यरत असून येत्या काळात दुबई, कॅनडा आणि इतर देशांमध्येही त्याचे कार्यक्रम होणार आहेत. या संपूर्ण प्रवासात त्याची पत्नी ईशा आशुतोष सुरजूसे ही त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहिली आहे. आई, पत्नी, मैत्रीण अशा अनेक भूमिका निभावत तिने आशुतोषच्या प्रत्येक संघर्षात त्याला साथ दिली. इंडियन आयडल आणि सा रे ग म प यांसारख्या अनेक मोठ्या रिॲलिटी शोमध्ये अपयश मिळूनही आशुतोष कधीच खचला नाही. तब्बल दहा वर्षांच्या संघर्षानंतर आज तो पुण्यात २०१८ पासून दोन शाखांसह स्वतःची संगीत अकॅडमी यशस्वीरित्या चालवत आहे. संगीताची साधना, कुटुंबाचा पाठिंबा आणि स्वतःवरील विश्वास यांच्या जोरावर आशुतोष सुरजूसे याने उभारलेली ही यशोगाथा आज अनेक तरुण कलाकारांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.